# उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेस 'आयपीओ'द्वारे ८८५ कोटी उभारणार

मुंबई, शुक्रवार (वृत्तसंस्था) – उज्जीवन फायनान्शियल सर्विसेस लि. ही एक बिगर बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) 'आयपीओ'द्वारे ८८५ कोटी रु. उभारणार आहे. कंपनीचा इश्यू २८ एप्रिल रोजी खुला तर २ मे रोजी बंद होईल. किंमतपट्टा २०७ रु. ते २१० रु. दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. तर प्रति इक्विटी शेअर १० रु. दर्शनीमूल्य असेल. कंपनीने 'सेबी'ला सादर केलेल्या आयपीओ प्रस्तावामध्ये ३,५८१.६१ दशलक्ष इतक्या इक्विटी शेअरचा समावेश असून इलेवार, एफएमओ, आयएफसी, आयएफआयएफ, एमयुसी, सर्वा कॅपिटल, डब्ल्यूसीपी आणि डब्ल्यू डब्ल्यूबीद्वारे २४,९६८,३३२ पर्यंतच्या इक्विटी समभाग विक्रीची ऑफर आहे. ही कंपनी २००५ मध्ये सुरू झाली. ३१ डिसेंबर २०१५ रोजी युएफएस कंपनीचे कार्य २४ राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशात तसेच भारताच्या २०९ जिल्ह्यांमध्ये पोहोचले असून या माध्यमातून सुमारे २.७७ दशलक्ष कार्यशील ग्राहकांना ४७० शाखांद्वारे आणि ७,८६२ कर्मचाऱ्यांच्या मदतीने सेवा दिली जात आहे.